## नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०२५ मधील निशाण क्र.६२ खालील आदेश

[ CNR No.MHKO090001572025 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ ते ८, १२(अ), १२(क), १२(ड), १४ ते १७ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, त्यांच्यापैकी काही जण वयस्कर व आजारी असलेने तसेच काही प्रतिवादी हे शेती कामामध्ये व्यस्त असलेने त्यांना मुदतीत वकिलांना योग्य ती माहिती देता आली नाही व त्यामुळे कैफियत दाखल करणेस विलंब झाला. तरी प्रतिवादी क्र.४ ते ८, १२(अ), १२(क), १२(ड), १४ ते १७ विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, अर्जात नमूद कारणे ही खोटी व लबाडीची आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामूंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस रु.१०००/– कॉस्ट आकारणेत यावी.

३. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण हे हक्कज्ञापन व कायम

मनाईकरिता दाखल करणेत आलेले आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी यांची बाजू न्यायालयासमक्ष येणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुतचा दावा हा पुराव्याचे कामी अजून लागला नसल्यामुळे विना–कैफियतचा आदेश रद्द केलेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी क्र.४ ते ८, १२(अ), १२(क), १२(ड), १४ ते १७ यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांची कैफियत स्विकारणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2026.02.13 11:41:19 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

स्थळ : गडहिंग्लज.　　　( न. श्री. पुरी )

दिनांक : ०९.०२.२०२६.　　　दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

गडहिंग्लज